MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान च्या वतीने आज जगप्रसिद्ध गायक, गीतकार, संगीतकार अजय-अतुल यांची लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली होती. अजय गोगावले, अतुल गोगावले यांसह मराठी इंडियन आयडॉल फेम रोहित राऊत आदी कलाकरांसह सैराटचे संगीत निर्माण केलेल्या ५० संगीत व पार्श्वगायकांच्या समूहाने ही कॉन्सर्ट सादर केली. यावेळी परळीकरांचा उत्साह शिगेला गेलेला पाहायला मिळाला. नाथ प्रतिष्ठानचे अध्यक्ष ना.धनंजय मुंडे यांनी यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने अजय अतुल व सहकलाकारांचे स्वागत केले.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -३५५ | सोमवार दि.१६ सप्टेंबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -355 | MONDAY DT.16 SEPTEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सरकारला आणखी एक संधी देतोय नंतर, मनोज जरांगे पाटील यांचा इशारा, पुन्हा उपोषण करणार




जालना : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील हे गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी लढा देत आहे. मनोज जरांगे पाटील हे आरक्षणाच्या मुद्द्यावर अनेकदा आंदोलन, उपोषण करताना दिसतात. मराठा समाजातूनही त्यांना मोठा पाठिंबा मिळतो. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर त्यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसलं आहे. मनोज जरांगे पाटील आज मध्यरात्रीपासून पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना याबद्दलची माहिती दिली.

आम्ही स्थगित केलेलं आमरण उपोषण आजपासून पुन्हा सुरु करत आहोत. आज मध्यरात्रीपासून आम्ही पुन्हा एकदा उपोषणाला बसणार आहोत. आम्ही तुमच्याकडे ९ ते १० मागण्या दिल्या आहेत. त्याची तातडीने अंमलबजावणी करा. त्यात कोणतीही अडवणूक करु नये. ज्या कुणाला सत्तेची खूप मस्ती आहे, त्यांना आज स्पष्टच सांगतोय, नंतर आमच्या नावाने तक्रार करू नका. तुम्हाला आत्ताच संधी आहे. मला यात राजकारण करायचं नाही. मला किंवा माझ्या समाजाला राजकारणात जायचं नाही. आजपासून आमरण उपोषण सुरु करत आहे. तसेच या उपोषणाच्या माध्यमातून आणखी एक संधी सरकारला देत आहे. नंतर आमच्या नावानं आरडाओरड करायची नाही, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.

धनगर बांधवांना विनंती आहे की उगाच भांडण विकत घेऊ नका. छगन भुजबळांचे एकूण भांडण करू नका. छगन भुजबळ बुद्धीभेद करून दंगली घडवणार आहेत. जालन्याच्या डझ आणि गृहमंत्र्यांना सांगतो, आमच्या एकाही माणसाला खरचटले नाही पाहिजे. तू इथे दंगल घडवू नको, तुमची (धनगर) आमची नाराजी नाही. मराठ्यांनी जर तुमच्या डढ आरक्षणाला विरोध केला, तर मग विरोध करा, तुमच्या आरक्षणाला धक्काच लागत नाही. एकाही धनगर आणि ओबीसी नेत्यांना मी दोष दिलानाही फक्त भुजबळांना दंगली घडवायच्या आहेत.



## राजकारणाचा एकही शब्द बोलणार नाही

आजपासून मी राजकीय विषयावर बोलणार नाही. मी आंदोलन करतो, कोणाची वाट बघत नाही, निवडणुकीशी आम्हाला देणे घेणे नाही. राजकारणाचा एकही शब्द बोलणार नाही, आमची अंमलबजावणी करा, नंतर बोंबलू नका. सरकारने आरक्षण दिले नाही तर त्याला देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील. भाजपमधील काही माकडे आहेत त्यांना सांगा की मनोज जरांगे फक्त आरक्षणाच्या



## मला राजकारणाकडे जायचं नाही

मराठा, कुणबी एक आहेत, असा जीआर लवकरात लवकर काढा. तसेच हैदराबाद, सातारा, बॉम्बे गॅझेट लागू करा. आम्ही राजकारण करू नये असे वाटत असेल तर आमच्या मागण्या पूर्ण करा. तुम्ही या किंवा येऊ नका. आपण आपली प्रक्रिया राबवत असतो, कोणी या म्हणून आंदोलन नसते, फूट पाडणे त्यांचं कामाचं आहे, मला राजकारणाकडे जायचं नाही, आमच्या व्याखेप्रमाणे अंमलबजावणी करा, तिन्ही गाझेट लागू करा, शिंदे समितीने २४ तास काम केले पाहिजे, असेही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

## शिंदेजी, वाचाळवीर संजय गायकवाडांना वेळीच आवरा, नाहीतर...; नाना पटोलेंचा इशारा

मुंबई : राहुल गांधी यांची जीभ छाटेल त्याला ११ लाखांचं बक्षीस देणार, असं खळबळजनक वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी केले आहे. यानंतर राज्यातील काँग्रेस नेते चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावरून संजय गायकवाड यांच्यासह महायुतीवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

नाना पटोले यांनी एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत संजय गायकवाड यांच्यावर निशाणा साधला आहे. शिंदेजी, वाचाळवीर संजय गायकवाडला वेळीच आवरा. ज्याला लोकप्रतिनिधी म्हणून वागायची अक्कल नाही, त्यानं राहुल गांधींवर बोलूच नये.



अंथरूण बघून पाय पसरावे म्हणतात ना, तसं गायकवाडनं आधी आपली पातळी पाहावी. प्रसिद्धीसाठी बरळणाऱ्या संजय गायकवाडवर गुन्हा दाखल झालाच पाहिजे. या सरकारची गुंडशाही, हुकूमशाही, तालिबानशाही जनता पाहत असल्याची टीका नाना पटोले यांनी केली.

राज्यात कायदा-सुव्यवस्था आहे की नाही?

नाना पटोले यांनी पुढे म्हटलंय की, पहिले भाजपचा एक नेता पक्षाचा झेंडा हाती घेऊन देशाच्या विरोधीपक्ष नेत्याला जीवे मारण्याची धमकी देतो.

## लोकसभेत तिकीट कापलेल्या हेमंत पाटलांना मंत्रिपदाचा दर्जा, मुख्यमंत्री शिंदेंकडून राजकीय पुनर्वसन

हिंगोली : शिंदे गटाचे हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील यांचं राजकीय पुनर्वसन करण्यात आलं आहे. हिंगोलीच्या बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन आणि प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. हळद संशोधन केंद्राच्या अध्यक्षपदाला मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. सन २०१९ ते २०२४ या काळात हेमंत पाटील हिंगोलीतून खासदार होते. मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांचं तिकीट कापलं गेलं. भाजपचा विरोध असल्याने हिंगोलीतून उमेदवार बदलत बाबूराव कदम यांना तिकीट देण्यात आलं होतं. मात्र त्या ठिकाणी शिंदेंच्या उमेदवाराचा पराभव झाला होता. आता लोकसभा



निवडणुकीच्या सहा महिन्यांच्या आत शिंदेंनी हेमंत पाटलांचं राजकीय पुनर्वसन केलं आहे.हिंगोली लोकसभेची उमेदवारी हेमंत पाटील यांना जाहीर केल्यानंतरही शिंदेंच्या शिवसेनेकडून मागे घेण्यात आली होती. भाजपच्या सर्व्हेचे कारण देत त्यांची उमेदवारी मागे घेण्यात आली होती. पण त्यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना शेजारच्या यवतमाळ वाशिम लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली होती. यामध्ये दोन्ही जागा या शिंदे गटाने गमावल्या. हेमंत पाटलांची उमेदवारी मागे घेतल्यानंतर ते नाराज होते अशी चर्चा होती. आता एकनाथ शिंदे यांनी हेमंत पाटील यांना मंत्रिपदाचा दर्जा देऊन त्यांची नाराजी दूर केल्याचे बोलले जाते.

# पि आय प्रविण बांगर याची मोठी कारवाई वीस तलवारसह आरोपी गजाआड

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई : येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत व गणेशोत्सवात कायदा व सुव्यवस्था आबधीत रहावी यासाठी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रमुखांना कारवाईच्या कडक सुचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने गेवराईचे उपविभागीय पोलिस अधिकारी निरज राजगुरू यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीवरुन पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांच्या अधिपत्याखाली पोलीसांनी सापळा रचून शनिवारी (दि.१४) दुपारी ३ वाजता सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील पाडळसिंगी टोलनाक्याजवळील अवैधरीत्या विक्रीसाठी आणलेल्या १८ नव्या कोऱ्या तलवारीसह आरोपीला ताब्यात घेऊन मोठी कारवाई केली आहे. ही कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.**

पाडळसिंगी टोल नाक्याजवळ अवैध मार्गाने तलवारी विकणाऱ्यावर मोठी कारवाई




गेवराई पोलिसांनी आरोपीला अटक करून १८ तलवारीसह दुचाकी केली जप्त!

पोलिसांनी आरोपीला मोठ्या शिताफीने अटक करून १८ तलवारी जप्त केल्या आहेत. भगवान फकिरा पवार (वय ४०) रा. हिरापुर, ता. गेवराई असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी भगवान फकीरा पवार हा अवैधरीत्या तलवारी आणून विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून पाठलाग करत आरोपीसह १८ नव्या कोऱ्या तलवारी, दुचाकी जप्त करून, आरोपीला जेरबंद केले आहे. सहायक पोलीस निरीक्षक दिपक लंके यांच्या तक्रारीवरून आरोपी भगवान पवार याच्याविरुद्ध गेवराई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भूतेकर करीत आहेत.

## सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ हे जिल्ह्याच्या पत्रकारिता क्षेत्रातील आन-बान शान आहे : – शेख युनुस

जनसामान्याचा आवाज हे ब्रीद घेऊन सायं.दैनिक आरंभ हे पहिल्या वर्षातच आपल्या लेखणीतून कोणालाही न घाबरता सर्वसामान्य शौषित, वंचित शेतकरी तसेच स्त्रियांच्या हक्कासाठी सदैव अग्रेसर असणारे दैनिक महाराष्ट्र आरंभ म्हणजे



आधुनिक युगात मोबाईल मध्ये अखखी पिढी गुरफटलेली असतानाही आपल्या धारदार लेखणीतून सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ हे बीडकराचा मनावर विश्वासतेचा ठसा उमटवत आहे. व एक वर्षापासून संपादक मा.श्री. दीपक थोरात साहेब व त्यांची टीम चांगल्या प्रकारे काम करत आहे. व बीड वासियाच्या मनात त्यांनी एक वेगळीच छाप निर्माण केलेली आहे. त्याबद्दल मी मनापासून दीपक साहेबांचे अभिनंदन करतो व भविष्यात जिल्ह्यातच नव्हे तर पूर्ण राज्यात सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ हे नाव लौकिक व्हावे ही अल्लाहकडे दुवा करतो...

शेवटी एक शेर म्हणावेसे वाटते की, मुबारक हो तुमको जो तुमने ये मुकाम पाया है ! ये फल ही है तुम्हारी मेहनत का
जो वक्त तुम्हारा दौर लाया है !!

# शंभुराजे गणेश मंडळाकडून आपला परिवार वृद्धाश्रम येथे किराणा साहित्य वाटप

नेकनुर ।प्रतिनिधी

नेकनूर जवळील कळसंबर येथील आपला परिवार वृध्दाश्रमाला शंभुराजे गणेश मंडळाच्या वतीने किराणा भेट दिला. गणेश उत्सवामध्ये इतर खर्चाला फाटा देत समाजउपयोगी कार्यक्रम राबवित समाजामध्ये एक आदर्श शंभुराजे गणेश मंडळाने निर्माण करीत आहे. या वर्षी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.व तसेच आपला परिवार वृध्दाश्रम कळसंबर या ठिकाणी वृध्द आजी-आजोबांना एक महिना पुरेल एवढे किराणा साहित्य वाटप करण्यात आले. दरवर्षी वेगवेगळे लोकोपयोगी उपक्रम राबवून



शंभुराजे गणेश मंडळ एक वेगळाच ठसा उमटवत आहे.प्रत्येक सामाजिक कार्यक्रमात शंभुराजे गणेश मंडळाची अग्रेसर आहे.मंडळाचे सामाजिक उपक्रम राबविण्यात मोठे योगदान असते.वृध्दाश्रमास किराणा भेट दिल्याबद्दल आपला परिवार वृध्दाश्रमाच्या संचालिका सौ. मनिषाताई पवार यांनी शंभुराजे गणेश मंडळाचे आभार व्यक्त केले. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष शहाजी शिंदे,वैभव शिंदे,गोविंद शिंदे,सचिन शिंदे,विशाल माने, नंदकिशोर शिंदे,योगेश शिंदे,अशोक शिंदे,मनोज शिंदे,बबलू सावंत,रंजित जाधव,जितेंद्र शिंदे,बंटी शिंदे,धनंजय शिंदे,ऋषिकेश शिंदे,आकाश शिंदे,आदेश शिंदे,आकाश शिंदे व मंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# घरकुल योजनेतील अनुदान ५ लक्ष करावे- शिवराम राऊत

शिरुर।प्रतिनिधी

शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा यांच्या सर्वसाधारण सभेतुन गरीब वर्गाच्या घरकुल योजनेसाठी पाच लाख अनुदान करण्यासाठी ठराव घेऊन या संबंधातील यंत्रणा मार्फत शासनाकडे शिवराम राऊत, विश्वांभर शिंदे पाठपुरावा करणार आहेत. भारत सरकार व महाराष्ट सरकारच्या वतीने विविध समाज घटकातील गरीब नागरिक,शेतकरी,ऊसतोड कामगार,अनुसुचित-जाती-जमाती,इतर मागास वर्गीय यांना रमाई आवास,प्रधानमंत्री,मोदी आवास,स्व.यंशवतराव चव्हाण,स्व.वंसतराव नाईक मुक्त वसाहत,अशा विविध योजनेतून घरकुल योजनेतील अनुदान मर्यादा हि एक लाख पन्नास हजार पर्यंत व त्यात देखील रो.ह.यो.अंतर्गत व शौचालय मधून विभागून निधी दिला जात असल्याने गावकुसातील गरीब, दारिद्र्यरेषेखालील,मजूर,बेघर,ऊसतोड कामगार,शेतकरी, मागास घटकांचे घरकुल योजनेतील लाभ देऊनही घराचे स्वप्न अधुरेच राहत आहे.सद्यस्थितील वाढलेली महागाई,बांधकाम साहित्याचे वाढलेले भाव,बांधकाम मजूरीचे वाढलेले दर,या मुळे विविध समाज घटकातील गरीब लाभार्थांना लाभ मिळवून देखील घरकुल पूर्ण करतांना अनेक



आर्थिक अडचणी येत आहेत.यामधील कालबाह्य झालेल्या निकष मधील सुधारणा करण्यासाठी शिवश्री कृषिमंडळ यांच्या वतीने शासनाकडे पाठपुरावा करून सर्व योजनेतील घरकुलासाठी किमान पाच लक्ष रू अनुदान करावे यासाठी आजच्या शिवराम राऊत यांच्या अध्यक्षते खालील बैठकित ठराव घेण्यात आला.यास सुचक श्री.विश्वांभर शिंदे,रामेश्वर पांडुळे व अनुमोदन ज्ञानोबा शिंदे व शिवनारायण दुधाळ यांनी केले.त्या प्रमाणे शिवश्री कृषिमंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने लवकरच प्रकल्प संचालिका ग्रामिनविकास यंत्रांनाच्या (जि.प.बीड) श्रीम. पाटील मॅडम यानां निवेदन करून प्रत्येक विभागप्रमुख यांच्या भेटून राज्य व केंद्रं शासनाकडे पाठपुरावा करण्याचे निश्चित करण्यात आल्याचे अध्यक्ष यांनी कळवले आहे. सर्वसाधारण सभेस सर्व पदाधिकारी,शेतकरी,मजूर,ऊसतोड कामगार सदस्य यांची उपस्थिती होती.



मौजे आडगाव (पौळ) गावातील शिवतेज गणेश मित्र मंडळाच्या गणरायाची आरती करून दर्शन घेतले. ं/ मौजे उमरद खालसा येथील शिवशंभू गणेश मित्र मंडळाच्या गणरायाची आरती करून दर्शन घेतले. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख अभिषेक भैय्या दिवे, विनोद गूंड पाटील, दिपक घोडके पाटील, महादेव खांडे, आर्यन खांडे, सुशांत खांडे, चाँद भाई पठाण, प्रताप देवडकर, अरुण कदम, महेश जाधव, महादेव घोलप, अनंत कापसे सह सर्व मंडळाचे कार्यकर्ते व गावकरी उपस्थित होते...!!

# अजय-अतुल यांनी प्रत्येक वर्षी गणेशोत्सवात परळीत यावे; धनु भाऊंची ती मागणी केली अजय अतुल यांनी पूर्ण

## धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सवात अजय-अतुल यांची लाईव्ह कॉन्सर्ट

**परळी ।प्रतिनिधी**

**जागतिक दर्जाचे व आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक असलेले गायक, गीतकार व संगीतकार अजय गोगावले व अतुल गोगावले हे परळीत दुसऱ्यांदा आले असून मागच्या वेळी त्यांनी ट्रॅक परफॉर्मन्स दिला होता तेव्हा आपण त्यांना त्यांच्या संपूर्ण संगीतकारांच्या व पार्श्वगायकांच्या टीमसह लाईव्ह कॉन्सर्ट करण्याची विनंती केली होती व आज त्यांनी ती विनंती पूर्ण केली. यापुढे अजय-अतुल यांनी त्यांच्या जगप्रसिद्ध संगीतकार व पार्श्वगायकांच्या संपूर्ण टीमसह प्रत्येक वर्षी परळीच्या गणेशोत्सवात यावे, अशी विनंती धनंजय मुंडे यांनी सुप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांना केली व त्यांनी ती लगेचच मान्य केल्याचे घोषित केले.**

नामदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवात काल सायंकाळी जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय-अतुल यांची ५० संगीतकार व पार्श्वगायकांच्या समूहासह लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली होती. यावेळी लल्लाटी भंडार, देवा श्री गणेशा, याड लागलं, तुझ्या प्रीतीचा विंचू मला चावला यांसारख्या सुप्रसिद्ध अशा एकापेक्षा एक सरस गीतांनी अजय-अतुल यांनी परळीकरांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

दरम्यान धनंजय मुंडे यांनी नाथ प्रतिष्ठानच्या वतीने अजय-अतुल यांच्यासह त्यांच्या टीमचे फेटा बांधून, शाल व सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना धनंजय मुंडे यांनी अजय गोगावले यांना त्यांचे प्रसिद्ध 'उमगाया बाप रे' हे गीत गाण्याची फर्माईश केली, त्याचबरोबर अजय गोगावले यांनी त्यांची ती फर्माईश पूर्ण करत त्यांच्या खास शैलीत उमगाया बाप रे हे गीत गाऊन अगदी भावनिक वातावरण निर्माण केले. गणेशोत्सवात उभारण्यात आलेले स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे सभागृह संपूर्णपणे भरून त्यापेक्षाही जास्त लोक आजूबाजूला व रस्त्यावर उभे राहून या संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद घेत होते. जवळजवळ चार तास चाललेल्या या लाईव्ह कॉन्सर्ट मध्ये एकही माणूस इकडचा तिकडे उठून गेला नाही.

# महाराष्ट्र गुरुकुल परिषदेच्या सामान्य ज्ञान स्पर्धेत यशोदीप गुरुकुल चे घवघवीत यश

**बीड ।प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील मुलांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून त्यांना शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धांची आवड निर्माण व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य गुरुकुल परिषदेने ५ सप्टेंबर शिक्षक दिन आणि १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन केले होते. या भव्य अशा सामान्य ज्ञान स्पर्धेतील बक्षीस वितरण कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार केशव दादा आंधळे, आदर्श संपादक वैभवजी स्वामी, स्वामी विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आदरणीय जगताप सर, साखरे सर, महाराष्ट्र गुरुकुल शिक्षण संशोधन परिषदेचे सन्माननीय अध्यक्ष डॉक्टर दत्ताजी नलावडे, सचिव रोहिदासजी रोहिटे, कार्यकारी अध्यक्ष विजयकुमार गिरे, स्पर्धा कार्यक्रम प्रमुख भागवत यादव, संतोष जी देशमुख, प्रदीपजी काळे आणि विविध गुरुकुलांचे संचालक यांच्या शुभहस्ते पार पडले.

यावेळी झालेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत २५ पेक्षा जास्त निवासी गुरकुलाच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या सख्येने सहभाग नोंदवला. जवळपास ४०० ते ५०० विद्यार्थी या स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. बक्षिसाची रचना प्रत्येक वर्गातून प्रथम द्वितीय आणि तृतीय अशा पद्धतीची होती. यामधून यशोदीप गुरुकुल च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. त्यामध्ये इयत्ता दुसरी मधून प्रथम विवान छेडेदार , तिसरी मधून प्रथम शिवतेष गिरे, पाचवी मधून प्रथम जय आमटे व द्वितीय सोहम काळे, सहावी मधून प्रथम अमिनेश गिरे, सातवी मधून प्रथम कुमारी पायल नलावडे, तुषार आमटे, मोहित सरगर आणि द्वितीय सोहम गव्हाणे, आठवी मधून प्रथम कृष्णा आंधळे, दत्ता आंधळे, साहिल बिक्कड , नववी मधून तृतीय रोहित कोकरे, दादासाहेब काकडे, अशोक




चौरे आणि दहावी मधून प्रथम कल्याण आंधळे, विशाल नलावडे,सोहम पोले, प्रथमेश तांदळे, नारायण मोहिते तर तृतीय हरिओम खोड, हरीश साबळे, श्रीमंत कोकरे अशा एकूण २३ विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले.

जवळपास ५००० ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरांमध्ये विविध गुरुकुलांमध्ये अध्यापनाचे धडे घेतात. उद्घाटन प्रसंगी माजी आमदार केशव दादा आंधळे मार्गदर्शन करताना म्हणाले की ग्रामीण भागातील मुलांना यानिमित्त विविध स्पर्धामध्ये संधी हा भविष्याचा यशस्वी वेध आहे. प्रमुख मार्गदर्शक आदर्श संपादक वैभवजी स्वामी यांनीही या ठिकाणी विद्यार्थ्यांना सुंदर असे मार्गदर्शन केले. यावेळी यशोदीप गुरुकुल च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच सर्वच बक्षीस पात्र विद्यार्थ्यांचा मान्यवरांनी सत्कार केला व कौतुक करून भावी यशासाठी शुभेच्छा दिल्या. या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे प्रास्ताविक भागवत यादव, सूत्रसंचालन अहिरे मॅडम, इंगळे सर यांनी तर आभार कार्यकारी अध्यक्ष गिरे सर यांनी मानले. यावेळी बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी कार्यक्रम प्रमुख यादव सर यांच्या मार्गदर्शनाखाली जाधव सर, माटे सर, घाडगे सर, लांडे सर,सोन्ने सर, पवार सर, देशमुख सर, काळकुटे सर, सर्व संचालकांनी परिश्रम घेतले.



**आयाज पटेल आपणांस कळविण्यात आनंद होतो कि, आपले संघटनातील कार्य पाहुन व आपले सामाजिक कार्य पाहुन आपली महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार सेना संघटना बीड जिल्हा या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तरी आपण संघटनाचे ध्येय धोरण समजुन घेऊन संघटना संघटन वाढवुन सौ. प्रमिलाताई आशोक माळी (ओतारी) चे हात बळकट करण्याचे काम करून संघटना वाढविण्याचे कार्य करावे. आपल्या पुढील कार्यास माझ्या हार्दिक शुभेच्छा...!**

# लबाड सरकारचं अवताण जेवल्याशिवाय खरं नाही-दत्ता वाकसे
# देवेंद्र फडणीस यांनी दहा वर्ष धनगरांना फसवलं आता शिंदे ही तेच करतात?

**बीड ।प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाचे एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी तात्काळ प्रमाणपत्र देण्यात यावे या मागणीसाठी विठुरायाची नगरी पंढरपूर येथे धनगर समाजातील तरुण सहा मावळे राज्यव्यापी आमरण उपोषणासाठी बसलेले आहेत आज त्यांचा आठवा दिवस असून राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी येणे अपेक्षित होते परंतु मुख्यमंत्री हे मुंबईत सह्याद्री अतिथी ग्रहावर बैठक घेऊन धनगरांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करत आहेत आता अशीच म्हणायची वेळ आलेली आहे लबाड सरकारचं जेवल्याशिवाय अवताण खरं नाही असे म्हणत उपोषणकर्त्याची भेट घेऊन शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे उपोषणाला पाठिंबा दर्शविला

पुढे बोलताना ते म्हणाले की धनगर समाज हा डोंगरदऱ्यामध्ये फिरून स्वतःची उपजीविका भागवत आहे अतिशय कष्टाळू समाज असून हा समाज अतिशय प्रभावी आहे भारतीय जनता पार्टीला मोठ्या प्रमाणात मताची भिक घेऊन सन २०१४ मध्ये भारतीय जनता पार्टीचे सरकार राज्यामध्ये आणण्यामध्ये धनगर समाजाचा सिंहाचा वाटा होता परंतु त्यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि आताचे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी धनगर समाजाला आश्वासन दिले होते राज्यामध्ये आमचे सरकार आल्यानंतर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करू परंतु त्यांनी ही धनगर समाजाला फसवण्याचा




काम केलेला आहे हा लढा धनगर समाजाच्या न्याय हक्कासाठी पंढरपुरातून आता उभारलेला आहे आणि हा लढा महाराष्ट्राच्या धनगर समाजाच्या घराघरांमध्ये पेटवला पाहिजे आणि याची ठिणगी सरकारच्या अंगावर पडून हे सरकार आता हद्दपार करायचे आहे जर का आरक्षणाचा प्रश्न शिंदे सरकारने त्रिमूर्ती सरकारने मार्गी लावला नाही तर आगामी काळात धनगर समाज विधानसभा निवडणुकीमध्ये घरचा रस्ता दाखवल्याशिवाय स्वस्त बसणार नाही धनगर समाजा प्रमाणे असलेला समाजातून या समाजावर गेल्या ७५ वर्षापासून अन्याय होतोय भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या पुष्ठ क्रमांक ३६ वर ओरान धनगर असा समाविष्ट केलेला आहे फक्त आरक्षणाची अंमलबजावणी करायची आहे त्यामुळे उपोषणकर्त्याच्या जीवितास काय हानी झाली तर त्याला सरकार जबाबदार राहील असे देखील शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हाईस प्रेसिडेंट दत्ताभाऊ वाकसे यांनी उपोषण स्थळावरून व्यक्त केले आहे

बीडचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा भ्रमणध्वनीच्या माध्यमातून पाठिंबा..!

बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे व्हॉइस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांच्या भ्रमणध्वनीच्या माध्यमातून उपोषणकर्त यांच्याशी संवाद साधून ते म्हणाले की माझा कायम धनगर समाजाच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या संदर्भामध्ये माझा कायम पाठिंबा आहे माझाच नव्हे तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट पक्षाचा देखील पाठिंबा आहे

# अमृता स्कूल ऑफ ब्युटी अँड मेकअप आर्ट चा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ संपन्न

**बीड ।प्रतिनिधी**

बीड येथे अमृता स्कूल ऑफ ब्युटी अँड मेकअप आर्ट चा बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभारंभ संपन्न झाला. यावेळी पालकमंत्री बोलताना म्हणाले की, स्कुल ऑफ ब्युटी मेकअप सारख्या संस्था मुंबई, पणे सारख्या शहरात आपण आतापर्यंत पहात अलोत मात्र आत्ता हे पण ते आत्ता बीड सारख्या शहरात अमृता अविनाश नाईकवाडे हिने सुरू केल्याने मला आनंद झाला आहे.या कोर्सचे प्रशिक्षण बीड जिल्ह्यातील मला महिलावर्ग नक्कीच घेतील महिला जर अशा पध्दतीचे उद्योग सुरू करत असतील तर महिलांना पूर्णपणे स्वातंत्र्य दिले पाहिजे. अमृता सारख्या मुलीचा मला सार्थ अभिमान वाटतो. तीला माझ्या पुढील वाटचालीस अगदी मनापासून शुभेच्छा असे पालकमंत्री धनंजय मुंडे म्हणाले.पुढे पालकमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की माझ्या दोन्हीही मुली यूएस जाऊन शिक्षण घेत आहेत त्यात एक जर्नालिझम करते, तर दुसरी आर्ट अँड डिझाईन करून परत आलीय, त्यांना पण बाहेरच्या देशात पाठवण्यासाठी घरातून विरोध होता, पण मी धाडस दाखवून त्यांना यूएस पाठवले आणि त्या तेथे शिक्षण घेत आहेत. त्याचे योग्य कारण म्हणजे भैयासाहेब यांचे चांगल्या प्रकारे मार्गदर्शन त्यांचे लाभले आहे. कारण ते चांगले मार्गदर्शन करतात असे अमरसिंह पंडित यांचे नाव घेऊन पालकमंत्री यांनी अमरसिंह पंडित यांचे विशेष कौतुक केले.त्यामुळे मी तर म्हणेन की मुलींना पूर्णतः स्वातंत्र्य असले पाहिजे त्या काही तरी करू इच्छित असतील त्यांना करू द्या. तर, माझ्या अमृता स्कुल ऑफ मेकअपच्या या स्कुलला व त्याच्या संस्थापिका अमृता अविनाश नाईकवाडे यांना खूप खूप शुभेच्छा आहेत.असेच काहीतरी नवीन केले पाहिजे, हे काय ब्युटी पार्लर नाही हे विद्येचे माहेर घर आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील युवतींना शिक्षण घेता येईल. युवती वर्ग यातून स्वतः स्वलंबी बनतील स्वतःच्या पायावर उभा राहतील, त्यांना एक प्रकारचा स्वतंत्र जगण्याचा मार्ग



अवलंबून राहील.सर्व या टीमला माझ्या खूप खूप देतो असे शेवटी पालकमंत्री मुंडे म्हणाले.यावेळी या कार्यक्रमाला उद्घाटन प्रमुख या राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे त्याचबरोबर विशेष उपस्थिती म्हणजे सिनेभिनेत्री सुरभी हांडे(जय मल्हार फेम), या कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मा.आ.राजेंद्र जगताप,सेलिब्रिटी अँकर आलेली मीनाक्षी बालकमल, राजेश्वर चव्हाण, मोईन मास्टर साहब, फारुख पटेल,अमर नाईकवाडे, कल्याण आखाडे,विठ्ठल सानप, नारायण शिंदे, बबनराव गावते, तालुकाध्यक्ष महादेव उबाले, नंदकुमार कुटे, आसाराम गायकवाड, अजिंक्य आनेराव, मोहन भोसले, विशाल पाटील, अतिश सर्वेदे, अश्पाक इनामदार, शेख मोहम्मद सादेक,प्रज्ञाताई खोसरे, प्रियताई डोयफोडे, सचिन मुळुक शिवसेना जिल्हाप्रमुख, भा.ज.पा. जेष्ठ नेते राजाभाऊ मुंडे, शिवाजीअप्पा मुंडे, मराठा समन्वयक किशोर आप्पा पिंगळे, व.भ.आ. मराठवाडा अध्यक्ष अशोकराव हिंगे, यावेळी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहुन अमृता स्कुल ऑफ ब्युटी मेकअप ला व या संस्थेच्या संचालिका अमृता अविनाश नाईकवाडे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी जिल्ह्यातील बहुसंख्येने युवती व महिला उपस्थित होत्या.

# रोटरी क्लब व माउली हार्ट केअर च्या वतीने भव्य मोफत रोगनिदान शिबीर संपन्न

## हृदयरोग तज्ञ डॉक्टर राधाकिसन डाके यांचा स्तुत्य उपक्रम



दिनांक १५ सप्टेंबर २०२४ रोजी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी व माउली हार्ट अँण्ड क्रिटिकल केअर संयुक्त विद्यमाने श्री गणेश उत्सव २०२४ निमित्त माजलगाव तालुक्यातील उमरी बुद्रुक या ठिकाणी भव्य मोफत रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सदरील शिबिरास माजलगाव तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त होऊन २५० पेक्षा अधिक नागरिकांनी रोगनिदान तपासनीत आपला सहभाग नोंदवला.तसेच सदरील कार्यक्रमाचे प्रोजेक्ट चेअरमन रोटरी चे सदस्य डॉ. राधाकिसन डाके यांनी आजच्या धावपळीच्या युगामध्ये निरोगी आरोग्य सुंदर जीवन कसे जगावे व जीवन जगताना योगा व व्यामाचे महत्तव सांगून हृदयाची काळजी कशी घ्यावी या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

सदरील कार्यक्रमास रोटरी क्लब चे सचिव सौ. लता जोशी, माजी अध्यक्ष श्री राजेश देशपांडे व सर्व सन्माननीय संचालक मंडळ उपस्थीत होतें... तसेच रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी चे नवनिर्वाचित अध्यक्ष ड.रवींद्र कानडे यांनी सांगितले कि, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटी च्या वतीने माजलगाव तालुकयातील नागरिकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा संकल्प केला असून नक्कीच त्यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच स्थानिक आयोजक उंबरी बुद्रुक चे सरपंच, उपसरपंच , सर्व गणेश मंडळ व समस्त गावकरी मंडळी यांनी उत्स्फूर्त पने सदरील शिबिराचे उत्कृष्ट आयोजन व सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. व रोगनिदान शिबीर यशस्वी पूर्ण झाले.



## मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांच्या सहकारी पतसंस्थेकडून ईशांत मनोज बचुटे सन्मानित

बीड ।प्रतिनिधी

शहरातील ईशांत मनोज बचुटे या विद्यार्थ्याने सन २०२३-२४ यावर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९१.६०% गुण घेऊन विशेष प्राविण्याने यश मिळविल्यामुळे त्याचा औरंगाबाद येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ सेवकांच्या सहकारी पतसंस्थेकडून सन्मान चिन्ह आणि १५००/- रोख असे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान इशांत ने आजोबा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे यांच्या सोबत स्वीकारला. यावेळी मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष किरण आवरगावकर, शमीम भाई, माळी साहेब यांच्यासह पतसंस्थेचे अध्यक्ष ए.एस.भोसले, उपाध्यक्ष आर.बी. खडेकर, सचिव डी.के. काळे, खजिनदार श्रीमती एस.एस. सरोवर यांची प्रमुख उपस्थिती होती. ईशांत मनोज बचुटे याचे औरंगाबाद येथील पतसंस्थेकडून प्रथम पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आल्याने त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हृदयी शुभेच्छा देण्यात येत आहे.

## गेवराई तालुक्याच्या विकासासाठी आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवावी – सय्यद सादेक चाचू

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई : मागील दहा वर्षापासून जनतेने आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांना विकासासाठी निवडून दिले होते. व आताही गेवराई तालुक्यातील जनता आमदार लक्ष्मण पवार यांना विकासासाठी निवडून देणार आहे. कारण की आमदार लक्ष्मण पवार यांनी मागील दहा वर्षात गेवराई तालुक्याचा चेहरा मोरा बदलून टाकलेला आहे. कित्येक वर्षापासून जे काम झाले नव्हते. तालुका विकासापासून वंचित होता. आमदार लक्ष्मण पवार हे आमदार होताच गेवराई तालुक्याला विकासाची गंगा वाहिल्यासारखी झाली व भरपूर प्रमाणात विकास कामे झाली, कारण की लोकांनी ६५ हजाराचे लीडने निवडून दिले होते. लोकांची विश्वास होते आणि ते विश्वास आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी पूर्ण करून दाखवले, त्यानंतर लोकांनी आमदार लक्ष्मण पवार यांना दुसऱ्यांदा पण निवडून दिले आणि दुसऱ्यांदा आमदार झाल्यानंतरही आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांनी त्याचप्रमाणे विकास कामे भरपूर प्रमाणात केली, व आता मागील काही दिवसापूर्वी अण्णा यांनी स्टेटमेंट दिला की मी व माझ्या परिवारातील कोणीही सदस्य निवडणूक लढविणार नाही. अण्णा आमच्यावर असे अन्याय करू नका, संपूर्ण तालुक्याची इच्छा आहे की, आपण आमदार व्हावे आपण आमदारकीची हॅट्रिक करावी व आपल्या गेवराई तालुक्याला बीड जिल्ह्यात विकास कामात एक नंबरला आणावे, आणि ते काम फक्त आमदार लक्ष्मण पवार हेच करू शकतात. हे विश्वास आम्हाला आहे. म्हणून अण्णा आपण या गेवराई तालुक्याच्या जनतेसोबत न्याय करावा व निवडणूक लढवावी ही आम्हा सर्व कार्यकर्त्यांची इच्छा आहे. असे कट्टर समर्थक लक्ष्मण सैनिक सय्यद सादेक चाचू यांनी प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.

## डॉ दत्ता तपसे यांचा वाढदिवस विविध उपक्रमानी साजरा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : डॉ. दत्ता तपसे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तसेच या कार्यक्रमात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. त्यात २५ रक्तदात्यानी रक्तदान केले, सर्व प्रकारच्या रक्त तपासणी झाल्या, डोळे तपासणी डॉ अविनाश अघोर यांनी केली, प्रसिद्ध मनसोपचारतज्ञ डॉ राजेश इंगोले यांनि उपस्थित राहून रुग्ण तपासणी केली, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र युसूफ वडगाव यांच्या वतीने आयुष्यमान कार्ड व प्रौढ क्षयरोग लसीकरण करण्यात



आले,१५० रुग्णांची तपासणी करण्यात आली. मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.बिडचे लाडके खासदार मा बजरंग बाप्पा सोनवणे यांचे चिरंजीव सौरव सोनवणे, समाजसेवक अमोल लोंढे, सूरज खोडसे उपस्थित होते,वेदांतचार्य विवेकानंद महाराज शास्त्री, गणेश महाराज माळेगावकर,डॉ केशव सारुख,मा सुनील भाऊ ठोसर प्रदेशाध्यक्ष रयत शेतकरी संघटना.डॉ सुमित मुंडे, डॉ शाम पाटील, डॉ चैतन्य कागदे, डॉ प्रज्ञा तरकसे, डॉ बलराज राठोड, डॉ कृष्णा पवार, डॉ उत्तम खोडसे, युवा उद्योजक गणेश चिरके, युवानेते किरण सातपुते, डॉ खोडवे, राहुल केंद्रे, ज्ञानेश्वर गिरी, महादेव राऊत, अशोक देवकर, अविनाश बोराडे, मनोज भोसले, बाळकृष्ण तपसे, आश्रुबा वागमारे, फिरोज शेख उपस्थित होते

# संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करु - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

ज्या काळात कुठल्याही सुविधा किंवा फारसा प्रतिसाद नव्हता त्या काळात स्व.काकूंनी या संस्थेला संजीवनी दिली म्हणूनच आज आपण पन्नास वर्षे पूर्ण करू शकलो एखादी संस्था सुवर्ण महोत्सव साजरा करते यामागे त्या संस्थेची वाटचाल उल्लेखनीय असते, संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करू असे प्रतिपादन माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

सोनाजीराव शिरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजच्या सुवर्ण महोत्सवाचा सोहळा आणि राष्ट्रीय होमिओपॅथी सेमिनारचे मोठ्या दिमाखात आयोजन करण्यात आले होते, संपूर्ण देशभरात विविध राज्यातून उपस्थित असलेल्या तज्ञ होमिओपॅथी डॉक्टरांची उपस्थिती होती, प्रारंभी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी आलेल्या सर्व मान्यवरांचे औक्षवंत करून स्वागत केले तर श्री गणेश वंदना हे कथक नृत्य सादर करून सोहळ्याचा प्रारंभ झाला त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, कुलगुरू डॉ.पिनांकिन त्रिवेदी, प्रति कुलगुरू डॉ.मिलिंद निकुंभ, डॉ.ओमप्रकाश शेटे, डॉ.विजुताई महिंद्रे-क्षीरसागर, डॉ.सुभाष सिंग, डॉ.शेंथील कुमार, डॉ.संजय गुप्ता, डॉ.सुशील कुमार डॉ.राजकुमार पाटील, डॉ.जवाहर शहा, डॉ.मोतीलाल, डॉ.कांचन देसरडा, डॉ.बाळासाहेब पवार, डॉ.अजित फुंदे, संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे, युवनेते हेमंत क्षीरसागर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ.अरुण भस्मे, प्राचार्य महेंद्र गौशाल, उपप्राचार्य डॉ.गणेश पांगारकर व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

प्रारंभी प्रास्ताविक प्राचार्य महेंद्र गौशाल यांनी तर संस्थेच्या वाटचालीची माहिती डॉ.अरुण भस्मे यांनी दिली तर सूत्रसंचालन नवी दिल्ली येथील डॉ.रुपाली भालेराव यांनी केले, यावेळी कार्यक्रमाला केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्हिडिओद्वारे सुवर्ण महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या तर उपस्थित मान्यवरांनी संस्थेचे कौतुक करून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संस्थेची वाटचाल पुढच्या प्रवासात अधिक बळकट होवो अशा भावना व्यक्त केल्या, तर कुलगुरू मिलिंद निकुंभ म्हणाले की एखादी संस्था पन्नास वर्षे पूर्ण करून सुवर्ण महोत्सव साजरा करते यामागे त्या संस्थेच्या कार्याची उंची सिद्ध होते सध्या फक्त ऍलोपॅथीच नव्हे तर आता आयुर्वेद आणि होमिओपॅथी सुद्धा गरजेची बंदी आहे होमिओपॅथीला ऍलोपॅथीची जोड ठेवून जर उपचार सुरू ठेवले तर नक्कीच होमिओपॅथी क्षेत्राला चांगले दिवस येतील असे ते म्हणाले, यावेळी कुलगुरू डॉ.पिनांकिन त्रिवेदी म्हणाले की, बीड सारख्या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुरू करून स्व.काकू आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सामान्य विद्यार्थ्याला उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत, याच महाविद्यालयातून आज देशभरात नामवंत डॉक्टर विस्तारित झाले आहेत अनेक विद्यार्थी उच्चपदस्थ म्हणून काम करत आहेत, देशभरात साडेतीन लाख होमिओपॅथी डॉक्टर प्रॅक्टिस करत असून ४५ होमिओपॅथी कॉलेज असून दरवर्षी पंधरा हजार विद्यार्थी डॉक्टर म्हणून बाहेर पडतात त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या भविष्याचा नक्कीच विचार व्हायला हवा असे सांगून त्यांनी सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी मेडिकल कॉलेजला सुवर्ण महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी बीड येथील माजी विद्यार्थ्यांनी डॉ.अरुण भस्मे यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.



यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, आज एस.के.एच. मेडिकल कॉलेजला पन्नास वर्षे पूर्ण झाले आहेत. ज्या मातृसंस्थेतून शिक्षण घेऊन पुढचा प्रवास सुरू केला आहे अशी सर्व मंडळी आज एकत्र आली आहेत या सुवर्ण महोत्सवाला देशभरातून मान्यवरांनी उपस्थिती दिली त्याबद्दल मी सर्वांचा आभारी आहे. स्व.काकूंनी मेडिकल कॉलेज प्रगतीपथावर नेले अनेक अडचणी आणि स्पीड ब्रेकर आले मात्र काकूंनी न डगमगता संस्थेची वाटचाल सुरूच ठेवली अनेक जण टीका करत होते साबुदाण्याच्या गोळ्या वाटून कुनाचे भले झाले का? किंवा रुग्ण बरा होतो का? पण आज त्याच गोळ्या चमत्कार घडू लागले आहेत कोरोना काळात आर्सेनिक नावाचे औषध आम्हाला आधार देणारे ठरले सगळ्या सीमा गळून पडल्या आहेत आता करलो दुनिया मुठी मे असे युग आहे जगाचा कारभार हातात दिसू लागला आहे विज्ञानाने भरभराटी घेतली आहे नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे आज सुवर्ण महोत्सव साजरा करताना आपण सर्वांनी प्रगतीच्या वाटेवर चालत जाऊया निवडणुका जरी असल्या तरी ही संस्था माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे हेच तर माझे खरे भांडवल आहे सत्ता पदे येतात आणि जातात पण माझी ही संस्था कायम माझ्याबरोबर आहे हे माझे भाग्य समजतो. आपण पुढील वर्षाकडे पाहत असताना, आपण या पन्नास वर्षात ज्यांनी साथ दिली त्यांचा यथोचित सन्मान, त्याचबरोबर सुवर्ण महोत्सवाचा उत्सव आणि आणि पुढील अमृत महोत्सवाच्या दृष्टीने संस्था अधिक बळकट होईल तिचा विस्तार होईल या दृष्टीने वेगवेगळ्या आयडिया किंवा कल्पना राबविण्याकडे लक्ष देऊ या.सुवर्णमहोत्सवी वर्ष हे संपूर्ण महाविद्यालयीन समुदायासाठी एकत्र येण्याची आणि संस्थेच्या अर्धशतकातील उल्लेखनीय कामगिरीचा उत्सव साजरा करण्याची एक अद्भूत संधी आहे. आपल्या संस्मरणीय इतिहासाकडे मागे वळून पाहता, संस्थेने आपल्या संधींचा पुरेपूर उपयोग केला आहे. संस्थेला आशादायक भविष्याकडे नेण्यासाठी सर्व संबंधितांनी नव्याने प्रयत्न करण्याची वेळ आली आहे, अशावेळी काहीतरी वेगळी थीम घेऊन यावर्षी आपण काम करावे आपल्या आगामी सर्व प्रयत्नांमध्ये आजचा दिवस सुवर्ण अक्षराने लिहिलेला गेला आहे संस्थेच्या पुढील काळात भरभराटीसाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करूया आणि संस्थेचे सुवर्णानंतर अमृत महोत्सव शतक शतक व सर्व महोत्सव साजरी व्हावेत यातील महत्त्वाचा हा पन्नास वर्षाचा मैलाचा दगड आहे, सुवर्ण महोत्सव साजरा करत आहोत याच जोमाने कदाचित याहीपेक्षा अधिक गतीने पुढच्या प्रवास सुरू ठेवण्याचा संकल्प आपण सारे मिळून करूया असे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी मनोगत व्यक्त करताना, आदर्श शिक्षण संस्था ही नामांकित संस्था म्हणून पुढे आली आहे होमिओपॅथीला राजाश्रय हवा असेल तर शासकीय योजनांमध्ये सहभाग घेणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले नैसर्गिक उपचाराद्वारे रुग्ण बरा करणे हे आयुर्वेद आणि होमिओपॅथी यांचे काम असून सध्या निवडणुकांचे वातावरण सुरू असतानाही अशा वातावरणात जयदत्त अण्णा आपल्या विद्यार्थ्यांमध्ये सामील होऊन त्यांना शक्ती देत आहेत, बीड जिल्ह्याचे अनेक नेते वैभव आहेत त्यात जयदत्त अण्णांसारखे वैभव सर्वांनी जपायला हवे असे ते म्हणाले यावेळी महाविद्यालयाच्या निमंत्रित माजी विध्यार्थ्यांचे सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, या सोहळ्यास होमिओपॅथी डॉक्टर, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि कर्मचारी तसेच निमंत्रित उपस्थित होते.

# डॉ.योगेशभैय्यांना बाप्पा पावणार!

## गणेशोत्सवानिमित्त डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याने पिंजून काढला मतदारसंघ यंदा बाप्पाच्या सर्वाधिक आरत्यांचा मान डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याला!

**बीड (प्रतिनिधी)**

**यंदाच्या गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला असून बीड विधानसभा मतदारसंघात सर्वाधिक आरत्यांचा मान डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याला मिळाल्याचे दिसून आले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने डॉ.योगेश व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी पायाला भिंगरी बांधून मतदारसंघ पिंजून काढला. दुसरीकडे त्यांना अनुकूल राजकीय घडामोडीवरून 'बाप्पा पावणार', असेच चित्र निर्माण झाले आहे.**



बीड विधानसभा मतदारसंघातील शहर व ग्रामीण भागात हजारो गणेश मंडळांनी गणपतीची स्थापना केली आहे. ठिकठिकाणी देखावे, सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांनी गणेश भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. अशातच गणपती बाप्पाची आरती करण्याचा मान मात्र सक्रिय राजकीय मंडळींनाच मिळाल्याचे दिसून आले. यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर व कल्पतरूच्या सचिव डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. त्यांनी बाप्पांच्या आरतीच्या निमित्ताने ठिकठिकाणी 'आशीर्वाद' घेत संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व कल्पतरू प्रतिष्ठानच्या माध्यमातून बीडमध्ये उत्कृष्ट देखाव्यांची स्पर्धा आयोजित केलेली आहे. त्यामध्ये विजेत्या मंडळांना लाखोंची बक्षिसे मिळणार आहेत. यासोबतच सामाजिक उपक्रमांनी गणेशोत्सव साजरा व्हावा, या दृष्टिकोनातून डॉक्टर क्षीरसागर दाम्पत्याने नेहमीप्रमाणे गणेश मंडळांना प्रोत्साहन दिले आहे.

उत्कृष्ट देखावे स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व कल्पतरू प्रतिष्ठानच्या माध्यमातून बीडमध्ये उत्कृष्ट देखाव्यांच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक गणेश मंडळांनी लक्षवेधी देखावे साकारले. यातील उत्कृष्ट मंडळांचा लाखांचे बक्षीस देऊन सन्मान होणार आहे.

# अँड सुरेश हत्ते विधानसभा निवडणूक लढवणार

## ४० ते ४५ गाव मतदाराशी गाठीभेटी, मतदारातून चांगला प्रतिसाद

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माजी जिल्हा परिषद सदस्य अँड सुरेश हते हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा होत असून त्यांनी निवडणूक लढवल्यास तालुक्यात तिसरा पर्याय म्हणून त्यांच्याकडे तालुक्यातील जनता निवडून आणू शकतात त्यामुळे गेवराई तालुक्याची निवडणूक तिरंगी होते की काय असे चित्र दिसत असून अँड सुरेश हाते निवडणुकीत उभा राहिल्यास त्यांचा तालुक्यात मोठा संपर्क आहे याचा त्यांना फायदा होऊ शकतो अशी चर्चा होताना दिसून येत आहेयाबाबत सविस्तर माहिती अशी की तलवाडा जिल्हा परिषद सर्कलचे माजी जिल्हा परिषद सदस्य अडवोकेट सुरेश हते हे विधानसभेच्या गेवराई मतदार संघातून निवडणूक लढविणार असल्याचे बोलले जात असून त्यांनी तालुक्यातील मतदारसंघातील गावे गावे फिरून आतापर्यंत ४० ते ५० गावातील मतदाराच्या गाठीभेटी घेतल्या असून ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील त्यांना मानणारा मोठा वर्ग असून बैठकीचे रूपांतर एखाद्या कार्यक्रमासारखे होत असताना दिसून येत असून विधानसभा लढवण्याची पूर्णच तयारी केली असल्याची दिसून येत आहे मात्र ते कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढवतात की आपली वेगळीच चूल माडतात हे पहावे लागेल मात्र त्यांनी निवडणूक लढविल्यास तालुक्यातील जनतेसमोर तिसरा पर्याय म्हणून एडवोकेट सुरेश हाते हे असू शकतात त्यांना राजकारणाचा २५ ते ३० वर्षाचा अनुभव असून त्यांनी अनेक कामे मार्गी लावलेले आहेत शेतकऱ्यांचा प्रश्न असेल पाण्याचा प्रश्न असेल रस्त्याचा प्रश्न असेल विजेचा प्रश्न असेल किंवा एखाद्या कार्यालयाशी लाभार्थ्यांची अडवणूक होत असेल तर अनेक ठिकाणी त्यांनी आवाज उठवून जनतेचे प्रश्न सोडवलेले आहेत तलवाडा सारख्या ग्रामीण भागात पंधरा वर्षांपूर्वी स्वर्गीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब यांनी



तलवाडा सारख्या ठिकाणी अँड हाते यांनी देशमुख साहेबांना आणण्याचे काम केले होते व त्यांच्या हातून कोट्यावधी विकास कामाचा उद्घाटन ही केले होते तलवाडा सारख्या ठिकाणी हत्ती यांनी रेकॉर्ड ब्रेक सभा घेतली होती आजही ती सभा तालुक्यातील जनता विसरली नाही एका शेतकऱ्याच्या पोराने गावात थेट मुख्यमंत्री आणला होता चांगली चर्चा त्यावेळेस झाली होतीअडवोकेट सुरेश हत्ते हे राज्यातील मंत्र्याशी सुद्धा त्यांचा चांगला संपर्क असून भविष्यात ते आमदार झाल्यास नक्कीच गेवराई तालुक्यात विकासाची गंगा वाहल्याशिवाय राहणार नाही हात्ते यांनी फेसबुक वर सुद्धा पोस्ट टाकल्यामुळे विरोधकांनाही धडकी भरली असल्याचे बोलले जात आहे येतंय विधानसभा निवडणुकीत कशी रणनीती आघतात याकडे तालुक्याचे लक्ष लागले असून त्यांच्या निवडणुकीत उतरल्याने गेवराई तालुक्याची निवडणूक तिरंगी होते की काय हे पहावे लागेल

# शिरसाळा पशु वैद्यकीय दवाखान्याचा लोकार्पण सोहळा



महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री माननीय धनंजय जी मुंडे साहेब यांच्या सुबह हातचे संपन्न झाला

सिरसाळा ।प्रतिनिधी

शिरसाळा परिसरातील लोकांना आनंदाची बातमी पशुवैद्यकीय दवाखान्याचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय धनंजय जी मुंडे साहेब यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी शिरसाळा गावचे माजी सरपंच राम दादा किरवले व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजेभाऊ च्या पोळ व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी व पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते या पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी प्रयत्न करणारे माजी सरपंच रामदादा किरवले व राजेभाऊ चाचा पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली या दवाखान्याची उद्घाटन झाले आहे व त्यांनी प्रयत्न केल्यामुळे या परिसरातील सर्व शेतकरी वर्ग कष्टकरी वर्ग व जनतेमध्ये पशुवैद्यकीय दवाखाना उद्घाटन झाल्यामुळे सर्व जनतेमध्ये आनंदाचे व उत्सवाचे वातावरण निर्माण होत आहे परळी तालुक्याचे कर्तव्यदक्ष आमदार आपला कामाचा माणूस माननीय धनंजय मुंडे साहेब यांना पसंती सर्व वर्गातून होत आहे त्यांनी पशुवैद्यकीय दवाखान्याच्या उद्घाटन केल्यामुळे परिसरातील जनतेचे त्यांना आभार देत आहेत

# तिरंगा रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी व्हा-इम्तियाज जलील

## मुस्लिम समाजा तर्फे एकतेचे दर्शन, भर पावसात बैठकीचे आयोजन जाहीर सभे मध्ये , धर्मगुरू, सामाजिक संघटनेचे, विविध पक्षाचे मान्यवरांची मोठी उपस्थिती .

बीड ।प्रतिनिधी

कोणत्याही पार्टीच्या बॅनर खाली जाणार नाही प्रत्येक जण मुसलमान म्हणून निघेल देश संविधानानुसारच चालेल तुमच्या गुंडगिरीवर आणि दादागिरीवर कदापि चालणार नाही या समाजातून कोणी उठणार नाही लढणार नाही असे तुम्ही समजत असाल तर तो तुमचा गैरसमज आहे आमच्या संयमाचा अंत पाहू नका तुम्ही आमच्या कोणाविषयी बोला नुकसान करा तर आम्ही सहन करू मात्र आमच्या धर्माकडे बोट दाखवण्याचा प्रयत्न कराल तर याद राखा ज्यांनी मानवतेचा संदेश दिला अशा नबी हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ)यांच्या विषयी गुस्ताखी (अवमान) कधी सहन करणार नाही असे स्पष्ट करत तुम्ही तोंडात येईल ते बोलत आहात मात्र याद राखा आम्ही ही मुके बहिरे नाहीत हमारे मुह मे भी जबान है जब खुलेंगे तो तुम्हारे लिये बहुत नुकसान दायी साबित होगी असा इशारा एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी मुख्यमंत्री व आमदार नितेश राणे यांना दिला आहे. कायदा सर्वांसाठी सामान आहे तुम्हाला जो आहे तोच आम्हालाही लागू आहे मग आमच्यावरच अन्याय का? असा सवाल ही त्यांनी उपस्थित केला. मुंबईत दिनांक २३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या तिरंगा रॅली बीड जिल्ह्यातील सर्व मुस्लिम बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे ही रॅली एखाद्या पक्षाच्या संघटनेच्या बॅनर खाली नाही तर ही राहिली समाजासाठी आहे प्रत्येकाने एक मुसलमान म्हणून या असे आव्हान ही इम्तियाज जलील यांनी बीडच्या बैठकी दरम्यान बोल्ले आहे.



बीड शहरातील गॅलेक्सी लॉन्स येथे तिरंगा रॅलीचे अनुषंगाने आयोजित तयारी बैठकीत एम आय आमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी रामगिरी महाराज आणि नितेश राणे यांच्या वक्तव्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट इशारा दिला आहे. रॅलीला परवानगी मिळेल न मिळेल याचा विचार करणारे आम्ही नाहीत आज आम्ही समाजासाठी एकत्र येत आहोत आम्ही सर्व काही सहन करू मात्र आमचे नबी हजरत मोहम्मद पैगंबर (स.अ) यांचा अवमान कधी सहन करू शकत नाही तुम्हाला रामगिरी महाराजाला काय झेड प्लस सुरक्षा द्यायची ती द्या पण उद्या त्याचाही वापर तुम्ही राजकारणासाठी कराल आम्ही शांत आहोत याचा अर्थ आम्ही मुके, बहिरे नाहीत आम्हालाही बोलता येते जेव्हा आमची जीभ बोलायला लागेल तेव्हा ते तुमच्यासाठी नुकसानीचे ठरेल असा इशारा जलील यांनी बीडच्या बैठकीतून दिला, या बैठकीस बीड मधील सर्व उलेमा इक्राम, ऍड. शेख शफिक भाऊ यांच्यासह सर्वपक्षीय नेते पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ड.शेख शफिक भाऊ खुर्ची वर न बसता उलमाच्या पायापशी..!

तिरंगा रॅलीच्या अनुषंगाने बीड येथे बैठक आयोजित करण्यात आली होती या बैठकीमध्ये इम्तियाज जलील उपस्थित होते स्टेजवर एमआयएम बीड जिल्हा अध्यक्ष ड.शेख शफीक भाऊ हे देखील उपस्थित होते मात्र हा राजकीय कार्यक्रम नसून समाजाच्या हितासाठी आहे हे शफीक भाऊ यांनी दाखवून दिले आहे, इस्टेज वरच्या खुर्चीवर न बसता उलमा ए दीनच्या पायापशी मांडी घालून बसून सिद्ध केले आहे.मुफ्ती अतीकुरहेमान, मौलाना जाकेर साहेब , मौलाना अखिल साहेब, मुफ्ती मोय्योदीन साहेब, मौलाना अब्दुल रहीम साहेब, मौलाना फारुख साहेब, मुफ्ती अन्वर साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मदरसे लहान मुलांनी कुराण पठण केले आणि खिरात पेश केली.विशेष मुफ्ती आरेफ साहेब उपस्थित होते. यावेळी विविध धार्मिक गुरु विविध पक्षाचे सामाजिक संघटनेचे नेते पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी दुआ करुन व राष्ट्रगीतनी कार्यक्रमची सागता झाली.



जरांगे पाटील बनले तरुणाच्या गळ्यातील तावीज.जरांगे पाटील यांचे हुबेहूब चित्र आदित्य सचिन माने यांनी काढले.व त्यांना सप्रेम भेट दिली.आदित्य सचिन माने यांचे पाटलांनी खूप कौतुक केले.

# विद्यार्थ्यांना अत्याधुनिक व दर्जेदार शिक्षणासाठी संगणक आवश्यक – राजेंद्र मस्के

## बऱ्हानपूर ग्रामपंचायत कार्यालय ईमारत बांधकामाचा शुभारंभ संपन्न ..!

बीड ।प्रतिनिधी

आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात जलदगतीने अत्याधुनिक माहिती प्राप्त करण्यासाठी संगणक प्रणाली महत्वाचे साधन आहे. डीजीटल माध्यमातून विविध अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी मुलांना जगाविषयी अधिकची माहिती मिळवण्यासाठी संगणकाला प्राधान्य दिले आहे. स्पर्धेच्या युगात सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी संगणकाची आवश्यकता लक्षात घेऊन, शालेय विद्यार्थ्यांना संगणक सुविधा पुरवण्याचे काम प्रामाणिकपणे झाले पाहिजे. अशी अपेक्षा भारतीय जनता पार्टीचे



जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी मौजे बऱ्हानपूर ता. बीड येथे संगणक संच शुभारंभ प्रसंगी व्यक्त केली.

आजभारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांचे हस्ते मौजे बऱ्हांणपुर येथील ग्रापंचायत निधीतून जिल्हा परिषद प्रा.शाळेस ७५ वर्षांनी २ कम्प्युटर संच देण्यात आले. या संचाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच राघव आकाश शिंदे याचा दुसरा वाढदिवस साजरा करण्यात आला. मौजे बऱ्हानपूर ता. बीड ग्रामपंचायत कार्यालय ईमारत बांधकामाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. यावेळी सरपंच गोरख शिंदे, ग्रामपंचायत सदस्य अतुल लांडे, बाळनाथ महाराज लांडे, मच्छिंद्र क्षीरसागर, कांतराव लांडे,बबन क्षीरसागर , सुनील क्षीरसागर, परमेश्वर मस्के, मच्छिंद्र लांडे, लिंबाजी लांडे, अंगणवाडी सेविका, शाळेचे मुख्याध्यापक बनकर सर, बद्रीनाथ जटाळ, विकास गव्हाणे आदी मान्यवरांसह ग्रामस्थ उपस्थित होते.



आचार्य टाकळी येथे एक गाव एक गणपती सर्वजनिक गणपती बसवला जातोशिरसाळा प्रतिनिधी बापू किरवले –आचार्य टाकळी येथे एक गाव एक गणपती व सर्वजणी गणपती सर्व जाती-धर्माचे लोक या गणपतीला सकाळी आणि संध्याकाळी आरतीला येऊन व दर्शन घेऊन महाप्रसाद त्याचा स्वाद घेतात व या गणपतीमध्ये एक गाव एक गणपती असल्यामुळे या गणपतीचे वैशिष्ट्य आगळावेगळा कार्यक्रम घेऊन केला जातो व विद्यार्थ्यांना वही पाटी पुस्तक होतं तर शेवटच्या दिवशी केल्या जाते असे या गणपतीचे वैशिष्ट्य आहे त्यामुळे या गणपती आजच्या महापूजेनंतर अन्नदान करण्यात आले आहे व या अन्नदानाचे योगदाते माजी पंचायत समिती सदस्य मोहन आबा आचार्य यांनी महाप्रसाद वाटून लगेच भक्तांनी महाप्रसादाचा स्वाद घेतला शेवटच्या दिवशी गावाच्या वतीने भक्ती पारायण किंवा कीर्तन असे कार्यक्रम ठेवण्यात येत आहे



# गेवराईत अजित दादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांगांना मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप

## खऱ्या अर्थाने अमरसिंह पंडित यांनी अजित दादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या – आ. बाळासाहेब आजबे

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शारदा प्रतिष्ठान गेवराई आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून मोफत कृत्रिम अवयव वितरण समारंभाचे गेवराईत आयोजन करण्यात आले होते. यापूर्वी आयोजित केलेल्या शिबिरात लाभार्थीचे मोजमाप घेण्यात आले होते. त्या सर्व लाभार्थ्यांना कृती अवयवांचे मोफत वाटप करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर आष्टीचे आमदार बाळासाहेब आजबे, शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, साधु वासवाणी मिशनचे प्रोजेक्ट हेड डॉ. मिलिंद जाधव, डॉ.सुशील ढगे, काकासाहेब शिंदे, शारदा प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, मुजीब पठाण, किशोर कांडेकर, जयदीप औटी, दादासाहेब घोडके, जय भवानीचे संचालक श्रीराम आरगडे, गणपत राठोड, सरवर पठाण, धोंडराईच्या सरपंच शितल साखरे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भाऊसाहेब नाटकर यांनी केले, तर श्रीराम आरगडे, किशोर कांडेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सुषमा वाघ या दिव्यांगाने प्रतिनिधीक स्वरूपात मनोगत व्यक्त करताना शारदा प्रतिष्ठानचे आभार व्यक्त करत अमरसिंह पंडित यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. लाखो रुपये किमतीचे कृत्रिम अवयव मोफत दिल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी कार्यक्रमाची भूमिका विषद करताना दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सतत प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. निराधारांच्या धरतीवर दिव्यांगांनाही थेट शासकीय अनुदान देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT